# कृत्रिम बुद्धिमत्ता व मराठी भाषा: रोजगाराच्या संधी

**चव्हाण मनोज उकंडराव**
ईमेल - manojchavhan2012@gmail.com

Crossref DOI - https://doi.org/10.63665/rh.v7i2.145

---

***सारांश :***

*'जगाचे स्वरूप बदलते आहे.भाषेचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. भाषेमुळे जग फारच जवळ आले आहे. AI सारख्या टुल्समुळे ही अनिवार्यता आणखीन सोपी झाली आहे. विविध क्षेत्रातील भाषेचे महत्त्व लक्षात घेता; AI सारख्या फेज मधून आपण जात असताना आधुनिक वैज्ञानिक आणि पारंपरिक पद्धतीने सगळ्यांच्या कल्याणासाठी समर्पित हे टुल्स वरदान ठरणार आहे. कदाचित भाषा नसती. व्यवहारात नसती तर कोणत्याही प्रकारची परिस्थिती अथवा परिणाम आवश्यक ठरले नसते. आधुनिकता अनिवार्यता बनत चालली आहे. कारण भाषा आहे. भाषा प्रत्येक दोन व अधिक व्यक्ति व समुदायाला जवळ जवळ आणत असते. भाषेचे AI च्या माध्यमातून केलेली चर्चा विस्ताराने विषयाची मांडणी ठरते. प्रस्तुत विषयावर विस्तृत माहिती मांडण्यासाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता व मराठी भाषा:-रोजगाराच्या संधी' हा विषय आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय परिषदेसाठी अनुस्यूत आहे. विषयाचा अभ्यास मल्टिटास्कींग ठरेल. विषय आणि AI फेज नवं सुंदर जग निर्माण करण्यासाठी अनिवार्य आहे. प्रस्तुत शोधनिबंधात शब्दांची मर्यादा ओळखून विषयाची सविस्तर मांडणी केली आहे. नाबिरा महाविद्यालय, AACST सोबत संयुक्तपणे "कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि समाजाचे भविष्य: बहुविद्याशाखीय दृष्टीकोन (ICAIFS-2026)" या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. या संदर्भात नागपूर विद्यापीठाचे, संस्थेचे तथा महाविद्यालयाचे, प्राचार्य – प्राध्यापक, आयोजक संयोजक समितीचे मन: पूर्वक अभिनंदन व शुभेच्छा!*

---

## कृत्रिम बुद्धिमत्ता स्वरूप व विवेचन :

AI चे पूर्ण रूप Artificial intelligence आहे. मराठीत कृत्रिम बुद्धिमत्ता असा अर्थ होतो. ही एक Tools आहे. ही एक सर्जनशील व सर्वसमावेशक प्रणाली विकसित होत आहे. या संदर्भात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मानवी सर्जनशीलतेचे भविष्य लेखात मोहिनी मोडक लिहितात, "एआय प्रणालीची सांगड जर मानवी भावनांशी घातली तर एआय अचाट कामगिरी करतो. ही प्रक्रिया आज सर्जनशीलता म्हणून ओळखली जाते. एआय च्या साहचर्यामुळे भविष्यात आपल्याला दिसतील एआय सहलेखक असलेले कथासंग्रह, पुस्तकं, आपोआप अपडेट होणारे माहितीपट, मानवी कल्पनांवर आधारित डिझाइन केलेल्या प्रदर्शन कलेक्शन किंवा एकाच खोलीत चित्रित करूनही मल्टिव्हर्समध्ये आणणारे सिनेमे.." एआय रोबोट नाही पण एआय च्या साहचर्यामुळे भविष्यात शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ सर्वदूर अभ्यासले जाणार आहे हे नक्की आहे.
विविध शाखेच्या क्षेत्रात व भाषेच्या बदलत्या काळानुसार भविष्याचा विचार करणे आवश्यक आहे. कलेच्या व

भाषेतील विविध क्षेत्रात तसेच जाहिरात क्षेत्रातही संकल्पना आणि प्रसारण व प्रक्षेपणापर्यंत मानवी सर्जनशीलता विद्यमान आहे. नुसार माहिती तयार करणे, टेटा बनवणे व प्रदर्शित करणे एआय लवकर करेल. त्यामुळे आपुलकी आणि नैतिकता यांचे विश्लेषण व क्रियान्वयण करणे सोयीस्कर ठरणार आहे. पुढे लेखिका लिहितात, "एआय अनेक पर्याय देतं.पण कुठला पर्याय निवडायचा हे ठरवणं ही खरी सर्जनशीलता आहे आणि ती फक्त मानवामध्येच आहे." एआय निर्मिती मानवी जीवनातील सर्वोत्तम उदाहरण ठरणार आहे. मानवाला भाषेचा वरदान मिळालेला आहे. मानवाला जलमत: नवनवीन प्रयोग व निर्माण करण्याचे, प्रतिभेचे वरदान मिळाले आहे. काळानुरूप एआय टुल्स किंवा एआय सर्जनशीलता यांची काळजी करण्याऐवजी त्या नव नियमाचे स्वागत केले पाहिजे असं म्हणता येईल. "एआयमुळे माणसाच्या कल्पनांना आणखी नवे रंग,नवी मिती मिळेल.काळाबरोबर रंगपेटी विस्तारत राईल, कुंचले अधिक निपूण होतील आणि कॅनव्हास अंतहीन असेल, एआय ची निर्मिती हा स्वतंत्र कलाप्रकार मानला जाईल." एआय सारख्या विषयावर चर्चा अभिनंदनीय आहे.त्या त्या भाषेतून चर्चा कुतुहल निर्माण करणारा आहे. असं म्हणतात स्पर्धा जगासोबत नाही तर स्वतः सोबत असावी. अभ्यासातून, संघर्ष करीत नवनवीन निर्मिती करावी. आपल्या देशातील भाषा आणि राष्ट्र आजपर्यंत उभा होतो आहे हे ' एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ' या संत तुकाराम महाराजांच्या ओळी प्रमाणे येथोचित सहाय्य ठरले आहे. त्यामुळे भारत देश विकसित होताना दिसत आहे. एआय टुल्स हेच सहाय्य करणार आहे. एआय सर्वांना सहकारी ठरणार आहे.स्पर्धक ठरणार नाही. त्यामुळे एआय शी मैत्री स्थापून माणूस आणि भविष्य घडू शकेल. एका हाताने टाळी वाजत नाही तसंच... आज देशातील अनेक सामाजिक सांस्कृतिक कायाकल्प होत आहे. भाषेचे आणि एआयचे सर्वोत्तम उदाहरण आहे. विश्वविद्यालयाचे अनुशासन, नियम, आदर्श मूल्ये व तत्वे चे पालन करून एआय हा विषय भाषा, शिक्षण, कृषी, पर्यावरण, बॅंकींग, आर्थिक, सृजनशील क्षेत्रात, नैतिक आणि सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रात सर्वसमावेशक सहिष्णू ठरेल. टेस्ला, आयबीएम वाटमन, गुगल भाषांतर, आरोग्य सेतू, ग्रामीण कृषी क्षेत्रात वापर आदी उदाहरण देता येईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार एआय टुल्स अभ्यासपूर्ण विचार करायला लावणारा आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व मराठी भाषा :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार नवीन अभ्यासक्रम क्षमता व कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रेरणा देणारा आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे मराठी भाषा अभ्यासक्रम सर्वलक्ष्यी आहे. साहित्य समाजाचा आरसा आहे. समाजाचे प्रतिबिंब साहित्यात भाषेद्वारे निर्माण होत असते. मराठी भाषा ही सहिष्णुता दर्शवते. भारतीय संस्कृती व सभ्यतेचे ते प्रतीक आहे. सांस्कृतिक आणि ऐतिहासिक संदर्भ यावर ते आधारित आहे.त्यामुळे एआय टुल्स च्या साहचर्यामुळे सांस्कृतिक ऐतिहासिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय धार्मिक साहित्यिक मूल्ये जपणे आवश्यक आहे. सायकोला ॅजिस्ट, करिअर कौन्सेलर व सा ॅप्ट – स्किल्स ट्रेनर डॉ नितीन विघ्ने लेखात काही मुद्दे अधोरेखित करतात, "NEP 2020 च्या अनुषंगाने मूल्यशिक्षण, मानसिक आरोग्य आणि संवाद कौशल्य वाढवावे लागेल.शाळा आणि महाविद्यालयांमध्ये Emotional Intelligence आणि Conflict Resolution यावर कार्यशाळा घ्याव्या लागतील." भाषा समाजाला सहिष्णुता प्रदान करते. शिक्षण प्रणालीत,भाषेत आणि मानसिक आरोग्य विषयक स्तरावर, सांस्कृतिक संवर्धन, संवाद असेल,

समाजमाध्यम असतील, समुदाय, सांस्कृतिक व भावनिक स्तरावर असेल शैक्षणिक धोरण व मराठी भाषा पूर्णपणे स्वरूप अधोरेखित करते. शैक्षणिक धोरण नुसार संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे पदवीचे मराठी भाषेचे अभ्यासक्रम व पाठ्यक्रम प्रेरणादायी आहे. संवाद कौशल्य, उपयोजित मराठी, भाषा विवेक, मराठी भाषा सुगम मराठी व्याकरण व लेखन, आणि साहित्य संदर्भ हे सर्व एआय व मराठी भाषा सहिष्णु आणि सर्वसमावेशक बनविण्यासाठी मार्गदर्शक ठरते.

"भाषेच्या संशोधनात प्रत्यही पाऊल पुढेच पडत आहे.अभ्यासात सारखी प्रगती होत आहे.' भाषा म्हणजे व्यवहारात प्रवृत्त करणा-या सार्थ व अन्वित ध्वनींचा समूह.भाषेत शब्द असतात. शब्द ध्वनींचे बनलेले असतात." वरील भाषेच्या व्याख्या भाषेचे स्वरूप स्पष्ट करते. प्रत्येक व्यवहाराला भाषा अनिवार्य आहे. AI टुल्सला भाषेची आवश्यकता नवनवे आयाम प्राप्त करण्यासाठी महत्वपूर्ण आहे. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मराठी भाषा अधिक समृद्ध होणार आहे. "भिन्न भिन्न संस्कृतीच्या किंवा भाषेच्या लोकांचा संबंध आला म्हणजेही नवे नवे परक्या भाषेतील शब्द भाषेत रूढ होतात." AI टुल्स या भाषेच्या माध्यमातून परिभाषीत होणार आहे. वरिल पुस्तकातील काही संदर्भ लक्षात घेता; एआय टुल्स हे क्षेत्र शिक्षण, कृषी, आरोग्यसेवा, ऑटोमोबाईल, वित्त, शुअरव्हेलन्स, सोशल मीडिया, इंटरनॅशनल, अवकाश संशोधन, गेमिंग, रोबोटिक्स, ई-कॉमर्सचा क्षेत्रात महत्त्वपूर्ण आहे. भाषेतही दैनंदिन व्यवहारात उपयोगी आहे. भाषा साहित्य, समाज व धर्म हे समसमान आहे. AI टुल्स आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार मराठी भाषा ही भाषाप्रेमी व अभ्यासक यांना ही उपयुक्तता निर्णायक ठरणार आहे.

**मराठी भाषेचे स्वरूप :**

मलकेर वात पलकेम' या बंजारा बोली भाषेतील बोल' या उक्तीप्रमाणे AI विधायक व स्वागतार्ह आहे. भाषेच्या माध्यमातून विषयावर चर्चा करण्यासाठी विस्ताराने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे पदवी अभ्यासक्रमाला योजिलेल्या संदर्भ ग्रंथांचा आधार घेतलेला आहे. मराठी भाषा विषय माझ्या अत्यंत जवळचा आहे. AI च्या माध्यमातून समजून घेण्यासाठी आणि मराठी भाषा ज्ञानभाषा झाली पाहिजे या दृष्टिकोनातून नक्कीच भाषेची जडणघडण यशस्वी ठरेल यात शंका नाही. बाबाजी दाते महाविद्यालय यवतमाळ येथील राष्ट्रीय परिषद, नोव्हेंबर 2025, अतिशय अभ्यासपूर्ण रितीने संपन्न झाली. मला या राष्ट्रीय परिषदमध्ये सहभाग व योगदान देता आला. मी भाग्यवान आहे. या परिषदेत जगाचे स्वरूप काय आहे. जग कशाप्रकारे जवळ आले आहे? जग कशाप्रकारे बदलत आहे? व्यक्तीने आणि व्यक्तीशिवाय जगाची आवक जावक रीत कशी चालते? मला काय पाहिजे ते सूचना दिल्यावर प्राप्त होते आणि त्यासाठी फार तर भरपूर लाभ कसा होऊ शकतो. सामाजिक माध्यमांचा वापर हेच उपलब्धी दर्शवत असते. मुंबई सारख्या ठिकाणी पहिल्यांदा रेल्वे धावली असन आणि त्यावेळी बैलगाडी चालवणारा समुदायांचा रोजगार जाणार का? हा प्रश्न असेल. तर नाही. या परिषदेत महाविद्यालयाचे आदरणीय अध्यक्ष साहेब यांच्या संवादातून अभिव्यक्त झालं. प्रत्यक्ष मा. साहेबांसोबत भेट झाली फार आनंद झाला. सगळे परिवर्तन आवश्यक वाटते. AI हा सामाजिक टुल्स वरदान आहे. आवश्यक आहे आणि नवीन आलं म्हणून जुनं गेलं असं होत नसून नवं आणि जुनं यांचा समन्वय असून भाषेचे स्वरूप

अधोरेखित करणारा आहे. मराठी भाषा विषय आहे आणि म्हणूनच हा विषय आंतरराष्ट्रीय पातळीवर समजून घेण्यासाठी देशात होत असलेल्या विविध राष्ट्रीय परिषद मार्गदर्शक ठरतात. आवश्यक ठरतात. देशातील विविध भाषा व बोली यांचा अभ्यास करून ते जगासमोर आणणे. विविध नवीन आणि जुनं यांचा समन्वय साधून रोजगार उपलब्ध करण्यासही मदत करणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची अंमलबजावणी निश्चितच भाषेचे स्वरूप अधोरेखित करते. विविध विश्वविद्यालयातील अभ्यासक्रम, चर्चा, परिषद व विविध शाखांमध्ये मोठ्याप्रमाणात नेमलेले पाठ्यपुस्तकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना प्रेरणा व व्यवसायाभिमुख शिक्षण व प्रशिक्षण संस्था संघटना व महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय योगदान ठरू शकतो. राष्ट्र उभारणीसाठी भक्कम पाया ठरु शकतो. त्यामुळे भाषेचे स्वरूप अधोरेखित होऊन ते विस्ताराने रोजगार उपलब्ध करणारे ठरते. नर्सरी, प्राथमिक ते उच्च शिक्षण व्यवस्थेत, विश्वविद्यालयात, महाविद्यालयात व संस्थेतून ही राज्य व राष्ट्रीय पातळीवर होणा-या परिषदा, कार्यशाळा - उपक्रम व अभ्यासक्रम मूल्यशिक्षणाचा पाया ठरतो. रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील ठरतो. मराठी भाषे संदर्भात AI चे वैविध्यपूर्ण वापर वैशिष्ट्ये आहेत. मराठी भाषेचे योगदान देशपातळीवर राहिले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर राहिले आहे. भाषा आणि संस्कृतीच्या पाऊलखुणा अजुनही जगाच्या पाठीवर सण उत्सव असेल, आस्था-श्रद्धेचे, साहित्य दर्शन स्वरूप माध्यम म्हणून भाषेचे अभिव्यक्त रुप आहे. राज्य पातळीवर अनेक संमिश्र प्रतिसाद भाषेचे महत्त्व अधोरेखित करते. पुस्तके व प्रकाशने यांचे खूप खूप अभिनंदन केले पाहिजे. अतिशय अभ्यासपूर्ण लेख असेल अभ्यासक्रम असेल वाचकांना, विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी उपलब्ध होत आहे. त्यामुळे रोजगार उपलब्ध नक्कीच होणार आहे.

**मराठी भाषा व रोजगार :**

पाटीवर लेखनी गीरवायला लावणारा माझा ईश्वर, मायबाप व गुरू हे माझं पहिलं जग आहे. हेच माझं कदाचित AI चं सर्वात श्रेष्ठ सामाजिक टुल्स असेल. आज रिल्स पासून ते AI चे सामाजिक सांस्कृतिक संदर्भ शिक्षण आणि भाषेचा उत्तम आरसा आहे. भाषा सुद्धा हेच सामाजिक टुल्स वरदान म्हणून प्रत्येक भाषकांना वरदान ठरलेलं आहे. मराठी भाषा या संदर्भात सर्व स्तरातून सहिष्णुता आणि सर्वसमावेशकता यांची मांडणी करते. या संदर्भात खालील वाक्य उद्धृत करीत आहेत. " संसद भवनाची नवीन इमारत असेल, पीएम सम्मान निधी, बेटी पढाओ- बेटी बचाव योजना असतील, स्वच्छ भारत अभियान, दिल्ली येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा असेल, नमो महासम्मान निधी असेल, लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ असेल, युपीतील महाकुंभ 2025 व विश्वपुरूष भगवान प्रभु श्रीराम यांच्या राष्ट्र मंदिरावर ध्वजारोहण 2025 असेल, संघ शताब्दी वर्ष 2025 असेल, देशातील सामाजिक सांस्कृतिक ऐतिहासिक वास्तू व विरासत असतील आणि महाराष्ट्रात 2026 मध्ये होणारं कुंभ असेल, मेट्रो रेल्वे रस्ते असेल, घर व्यक्ती समाज समुदाय व शिक्षण व कृषी व्यवस्था असेल, भारतीय खेळाडूंचे विश्वकप गवसणी असेल, देशातील वंदनीय व पुजनीय पुतळ्याची निर्मिती व अनावरण असेल, नवनवे तंत्रज्ञान विकसित करण्याचे काम असेल हे सर्व एक भारत श्रेष्ठ ते सर्वश्रेष्ठ भारताचे प्रतीक आहे. विश्वास व विकासाची AI. प्रींट आहे. सरकार कल्याणकारी धोरणं आणि योजना बनवून अंमलबजावणी करतो. AI चं सर्वात चांगले उदाहरण ठरते. भाषा ह्या संदर्भात रोजगाराची संधी आणि जननी ठरते. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात पदवीला विद्यार्थी OE, Language , AEC,

SEC, IKS, Major -Minor सारखा अभ्यासक्रम शिकत आहे. वेगवेगळ्या भाषेचा वापर करत आहे. यासाठी AI चा वापर होत आहे. राज्यातील स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या सर्व भाषा व बोली यांचे रोजगाराभिमुखविश्लेषण आहे. लेखन वाचन संवाद या माध्यमातून मराठी भाषा रोजगार व स्वयंरोजगार व कौशल्येभिमुख ठरत आहे.” हे भाषेचे पैलु रोजगाराभिमुख विश्लेषण करून देते.

**निष्कर्ष :**

'जगाचे स्वरूप बदलते आहे.भाषेचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. भाषेमुळे जग फारच जवळ आले आहे. AI सारख्या टुल्समुळे ही अनिवार्यता आणखीन सोपी झाली आहे. विविध क्षेत्रातील भाषेचे महत्त्व लक्षात घेता; AI सारख्या फेज मधून आपण जात असताना आधुनिक वैज्ञानिक आणि पारंपरिक पद्धतीने सगळ्यांच्या कल्याणासाठी समर्पित हे टुल्स वरदान ठरणार आहे. कदाचित भाषा नसती. व्यवहारात नसती तर कोणत्याही प्रकारची परिस्थिती अथवा परिणाम आवश्यक ठरले नसते. आधुनिकता अनिवार्यता बनत चालली आहे. कारण भाषा आहे. भाषा प्रत्येक दोन व अधिक व्यक्ति व समुदायाला जवळ जवळ आणत असते. भाषेचे AI च्या माध्यमातून केलेली चर्चा विस्ताराने विषयाची मांडणी ठरते.

**संदर्भग्रंथ :**


- संपा.,शैलेश पांडे, तरूण भारत, दीपोत्सव अंक, नागपूर, वर्षे 2025
- कृपा. कुलकर्णी, मराठी भाषा व विकास, मेहता पब्लि. हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती 1933
- प्रा.मनोज चव्हाण, लेखन, वर्षे 2025.